जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
(आस्थापना विभाग)
फोन क्र.02442/222604 फॅक्स क्र.02442/222011

---

क्र/2016/आरबी-डेक्स 1/आस्था/1/भरती16/कावि
जिल्हाधिकारी कार्यालय बीड.
दिनांक 27/09/2016

प्रति,
श्री / श्रीमती
(सोबतच्या तलाठी/लिपीक/शिपाई संवर्गाचे अंतरिम निवड व प्रतिक्षा यादीप्रमाणे)

**विषय- सरळसेवा भरती प्रक्रिया-2016**
**तलाठी, लिपीक-नि-टंकलेखक/कनिष्ठ लिपीक व शिपाई**
**संवर्गासाठी अंतरिम निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीस उपस्थित राहणे बाबत.**

**संदर्भ-** जिल्हाधिकारी कार्यालय बीड ची जाहिरात
क्रमांक 1/2016/आरबी-डेस्क/आस्था-1/कावि-403 , दिनांक 06.08.2016.

जिल्हा निवड समिती, बीड मार्फत जिल्हाधिकारी बीड यांचे आस्थापनेवरील **तलाठी, लिपीक-नि-टंकलेखक/कनिष्ठ लिपीक व शिपाई** सवंर्गातील रिक्त पदे भरणेसाठी पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यातील ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा दिनांक 04.09.2016 व 11.09.2016 रोजी घेण्यात आली.

सदर लेखी परिक्षेत उत्तीर्ण होऊन खालील प्रमाणे अंतरिम गुणवत्ता यादी (अंतरिम निवड यादी व अंतरिम प्रतिक्षा यादी) प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर यादीत आपले नाव समाविष्ट असून आपण **दिनांक 04.10.2016 रोजी सकाळी 11.00 वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय बीड** येथे कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित रहावे.

कागदपत्र पडताळणीस येतांना खाली नमुद केले प्रमाणे सर्व मुळ कागदपत्र / प्रमाणपत्र त्यांच्या साक्षांकित छायाप्रतिंच्या एक संचासह वर नमुद ठिकाणी व वेळी स्वखर्चाने न चुकता उपस्थित रहावे. आपण विहित वेळेत व दिवशी उपस्थित न राहिल्यास गुणवत्तेप्रमाणे पुढील उमेदवाराचा विचार करण्यात येईल. याबाबत आपणास कोणताही दावा सांगता येणार नाही.

1. संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जाची प्रत.
2. भारतीय स्टेट बँकेमध्ये परीक्षा फी भरलेल्या चलनाची मुळ प्रत.
3. भारतीय नागरीक असल्याबाबतचे प्रमाणपत्राची(Nationality) मुळ प्रत.
4. महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याबाबतचे प्रमाणपत्राची (Domicile) मुळ प्रत.
5. महाराष्ट्र राज्य विभागीय शिक्षण मंडळ माध्यमिक शालांत परीक्षा(S.S.C.) उत्तीर्ण असल्याबाबतचे गुणपत्रकाची मुळ प्रत व परीक्षा प्रमाणपत्राची (Board Certificate) मुळ प्रत. तसेच महाराष्ट्र राज्य विभागीय शिक्षण मंडळ उच्च माध्यमिक शालांत परीक्षा(H.S.C.) उत्तीर्ण असल्याबाबतचे गुणपत्रकाची मुळ प्रत व परीक्षा प्रमाणपत्राची (Board Certificate) मुळ प्रत.
6. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, मुंबई यांचेकडील दि. 01 जूलै 2010 च्या अधिसूचनेनुसार पदवी परीक्षा उत्तीर्ण असल्याबाबतचे मुळ प्रमाणपत्र व मुळ गुणपत्रक.
7. टंकलेखनाची शासकीय वाणिज्य मंडळाची प्रमाणपत्र परीक्षा कमीत कमी मराठी ३० शब्द प्रति मिनीट किंवा इंग्रजी ४० शब्द प्रति मिनीट उत्तीर्ण असले बाबत आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे यांनी दिलेले मुळ प्रमाणपत्र.
8. शाळा सोडल्याच्या दाखल्याची (L.C./T.C.) मुळ प्रत.
9. सामाजिक आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उपमेदवारांनी (मागासवर्गीय) मुळ जात प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास मुळ जात वैधता प्रमाणपत्र.
10. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अ. जाती, अ.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.8 मधील कलम 4(2)(दोन) मधील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेयर) तत्व, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, विमाप्र व इमाव ह्या प्रवर्गाना लागु करण्यात आलेले आहे. त्यानुसार शासन परिपत्रक सामाजिक न्याय व सांस्कृतीक काय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-10/2005/प्र.क्र.15/मावक-5 दिनांक 30/6/2006 सोबतच्या सुधारित नमुन्यात उपरोक्त प्रवर्गातील उमेदवारांनी वर्ष

जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
(आस्थापना विभाग)
फोन क्र.02442/222604 फॅक्स क्र.02442/222011

---

2016-2017 ह्या कालावधी करिता वैध असलेले (अर्थात दि 31.03.2017 पर्यंत वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेयर) मुळ प्रमाणपत्र.

11. खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी असलेले आरक्षण महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र.82/2001/मसेआ-2000/प्र.क्र.415/का-2, दिनांक 25.05.2001 आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षण अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी वर्ष 2016-2017 या कालावधी करिता वैध असलेले (अर्थात दि 31.03.2017 पर्यंत वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबातचे (नॉन क्रिमिलेयर) मुळ प्रमाणपत्र.
12. अंशकालीन कर्मचारी यांनी त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडे केलेल्या नोंदणीचे प्रमाणपत्र आणि अंशकालीन कर्मचारी म्हणून कामकाज केले असल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याचे मुळ प्रमाणपत्र सादर करावे.
13. माजी सैनिकांनी जिल्हा सैनिक कल्याण मंडळाकडे नांव नोंदणी केलेबाबतचे प्रमाणपत्र व सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले सैनिकी सेवे संदर्भातील मुळ प्रमाणपत्र सादर करावे. मृत माजी सैनिकाच्या कुटुंबातील व्यक्ती असल्यास तसे नामनिर्देशन प्रमाणपत्र सादर करावे.
14. महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस 2012/प्र.क्र.277/39, दिनांक 04/02/2013 मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक अर्हता परीक्षांपैकी कोणतीही एक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याबाबतचे मुळ प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत M.S.C.I.T. अथवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत 'C.C.C' किंवा 'O' स्तर 'A' स्तर किंवा 'B' किंवा 'C' स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तर्णी झाल्याचे मुळ प्रमाणपत्र.
15. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 मधील तरतुदीनुसार गट अ ते ड मधील पदांच्या सेवा प्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणुन विहित नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.
16. छायाचित्र ओळख पुरावा (ओळखपत्र/Photo Identity Card)
17. कागदपत्र पडताळणीमध्ये निदर्शनास आलेल्या वस्तुस्थितीनुसार निवडयादी व प्रतिक्षायादी दुरूस्ती करणे किंवा रद्द करणे याचे सर्व अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी बीड यांना राहतील.
18. उक्त सर्व उमेदवारांना कागदपत्रांची पूर्ण पडताळणी तसेच जाहिरातीत नमुद सर्व निकषांची पुर्तता झाल्याशिवाय नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
निवासी उपजिल्हाधिकारी बीड